**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट                    दिनांक - १८/०८/२०२२

### दि.१८/०८/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहरोड ५३६/२०२२ भादविक. ३५४(डी),३२३,५०४,५०६,३४२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | एप्रिल २०२२ रोजी पासुनते आज दि. १८/०८/२०२२ रोजी १५/०० वा. पर्यत शितळानगर गल्लीत देहुरोड ता. हवेली जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/०८/२०२२ रोजी वेळ १९/०५ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | अर्जुन शशी सप्पागुरु वय-२१ वर्षे रा. शितळानगर नं. ०१ देहुरोड ता. हवेली जि.पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या घरातुन निघुन आंबेडकर रोडने सवाणा ब्रिज जवळील ऑफिस मध्ये जात असतांना कोहली गॅसचे ऑफिसचे पाठीमागे आरोपी मजकुर याने फिर्यादीला गण दाखवुन जर तु माझे बरोबर राहणार नाहीस तर तुला जिवंत राहण्याचा काहीच अधिकार नाही अशी धमकी देवुन दि. १४/०८/२०२२ रोजी सायंकाळी १६/०० वा. चेदरम्यान रिलायंन्स मॉल रावेत येथे आरोपी याने फिर्यादीचा पाठलाग करुन फिर्यादीचा फोन ओढुन घेवुन फिर्यादीला मारहाण करुन शिवीगाळ केली व दि. १८/०८/२०२२ रोजी आरोपी याचे मोबाईल मध्ये यापुर्वी त्याने काढलेले फिर्यादीचे वआरोपीचे फोटो त्याने गल्लीतील मुलांना व खास मित्राना दाखवुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि/जाधव ८१०८८५६५६५ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ३८०/२०२२ भादवि कलम ४९८(अ), ३५४, ३२३, ३१३, ५०४, ५०६, ३४ सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ कलम ३ सह मुस्लीम महीलांच्या हक्काचे सरंक्षण अधिनियम २०१९ कलम ४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१९/११/२०२० रोजी ते दि.०५/८/२०२२ रोजी पर्यत पटेल निवास,लक्ष्मी मंदिर शेजारी,भोसरी गावातील पी.सी.एम.सी.बस स्टॉप चे समोर,खंडोबा माळ,भोसरी,पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि १८/०८/२०२२ रोजी १९/४२ वा |
| फिर्यादी | :- | महीला फियार्दी |
| आरोपी | :- | १) फरियाज पापभाई पटेल वय ३४ वर्षे ,२) पापाभाई पटेल,वय ६५ वर्ष,रा.सदर, ३) बानु पापाभाई पटेल,वय ६० वर्ष, मोठा ४) आझम पापाभाई पटेल,वय ३८ वर्ष,रा.सदर ५) मुमताज तन्वीर चौगुले (वडीलाकडील नाव मुमताज पापाभाई पटेल),वय ३६ वर्ष सर्व रा. पटेल निवास,लक्ष्मी मंदिर शेजारी,भोसरी गावातील पी.सी.एम.सी.बस स्टॉप चे समोर,खंडोबा माळ, भोसरी,पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर यांनी फिर्यादीचे लग्न झाल्यापासूनच लग्न आमच्या मना प्रमाणे झाले नाही. लग्नात आमचा मानपान पाहिजे तसा दिला नाही. आमची अपेक्षे प्रमाणे सोने नाणे दिले नाही. त्यांना लग्न आवडले नाही. असे बोलून फिर्यादींना त्रास दिला फिर्यादी गर्भवती असताना फिर्यादींची फसवुन डोकेदुखीची गोळी आहे |

असे सांगुन फिर्यादीस गर्भपाताची गोळी खायला घालून फिर्यादींचा गर्भपात करण्यासाठी काहीतरी जादुटोणा करुन गर्भपात करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या जेवणात उदी टाकुन, तसेच बेडरुम मध्ये ठिकठिकाणी मंतरलेले लिंबु व तत्सम वस्तु ठेवून फिर्यादींच्या मनात जीवाची भिती उत्पन्न केली आहे. तसेच फिर्यादींवर संशय घेऊन परवानगीशिवाय खाजगी व्यक्तीकडून मोबाईलचे सीडीआर काढून त्यातील मोबाईल नंबरवर फोन करुन चारित्र्यावर शिंतोडे उडवून मनाला लज्जा उत्पन्न होईल असे बोलले आहेत. तसेच फिर्यादीशी त्यांची दिर आरोपी क्र.४ यांनी लगट करण्याचा प्रयत्न करुन मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे. तसेच सासरच्या सर्व मंडळींनी नांदविण्यासाठी माहेरच्यांकडून ४ तोळे सोने हुंडयाची आणखी मागणी केली. ते न दिल्याने घाणेरडया शिवीगाळ करुन मारहाण केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि/धापटे ९०७५४२६९२१

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ७११/२०२२ भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८०, प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/०८/२०२२ रोजीसकाळी ११/०० वा पासुनतेदि. १६/०८/२०२२ रोजीचे सकाळी ०७/०० वा चेदरम्यानफ्लॅट नं ७०४, स्काय लाईन सोसायटी, ए विंग, ७ वा मजला, चौधरी पार्क, वाकड पुणे

गुन्हा दाखल :- दि.१८/०८/२०२२ रोजी १५.२२ वा.

फिर्यादी :- महीला फिर्यादी

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- वर नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे कुटुंबीय बेंगलोर येथे गेले असताना फिर्यादीचे बंद घराचे दरवाजाचे लॅच लॉक कोणीतरी अज्ञात इसमाने उचकटुन घराचा दरवाजा उघडुन घरात प्रवेश करुन फिर्यादीचे घरात असलेल्या देव घरातील लाकडी कपाटाचे दरवाजे उघडुन तसेच ड्रॉवर उघडुन त्यामध्ये ठेवलेल्या ५६२५०/- रु की चे २२.०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने ,८०००/- रु की चे चांदीचे दागीने व ३५,०००/- रु रोख रक्कम असे एकुण ९९२५०/-रु की चे सोन्याच्या व चांदीच्या वस्तु तसेच रोख रक्कम फिर्यादीचे संमतीशिवाय मुद्दाम लबाडीचे व चोरीचे इरादयाने घरफोडी करुन चोरुन नेल्या आहेत. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि/मासाळ ७२७६०८७१७०

४.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ४२२/२०२२ भा द वि कलम ३७९ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १७/०८/२०२२रोजी रात्रौ ११/०० वा दिनांक १८/०८/२०२२ सकाळी ०९/३० वा दरम्यान कृष्णा हौसींग सोसायटी,त्रिवेणीनगर चिखली पुणे येथील सार्वजनिक रोडवरुन

गुन्हा दाखल :- दि.१८/०८/२०२२ रोजी १२/१९ वा

फिर्यादी :- अक्षय कैलास दहिवाल वय २१ वर्षे धंदा शिक्षण रा.जय बजरंग तालमीजवळ आहेरवाडी,जाधववाडी चिखली पुणे

आरोपी :- आज्ञात इसम

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची २०,०००/- रू किमतीची हिरो होंन्डा स्प्लेंडर मोटार सायकल एम एच १४ जी डब्ल्यु ३२३१ ही राहते सोसायटीच्या सार्वजनिक रोडच्या कडेला लॉक करुन पार्क केली ती त्यांचे संमती शिवाय कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीच्या इराद्याने चोरुन नेली म्हणुन तक्रार

त.अधिकारी/अंमलदार :- पोना मासाळ ९५५२५२६९९७

५.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ७९१/२०२२ भा.दं.वि.क.३७९,४२७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१७/८/२०२२रोजी सकाळी ०७/५० वा म्हांळुंगे-नांदे रोडवरिल पाडळे चौक जवळ महाळुंगे पुणे

गुन्हा दाखल :- दि.१८/०८/२०२२ रोजी १८/३६ वा.

फिर्यादी :- अमित प्रकाश भगत वय-३९ वर्षे,धंदा- नोकरी, रा- सर्व्हे न ५३, समर्थ अंगण कोल्हेवाडी, खडकवासला,ता हवेली पुणे

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयाने जिओ कंपनीच्या टॉवरची ८०००/-रु की ची एक्साईड एक्सप्रेस कंपनीची जनरेटरची बॅटरी,व ८०००/- रु की ची पॉवर केबल,असा एकुण १६०००/- रु की चा माल चोरुन नेले आहे तसेच लॉकच्या पट्या तोडुन नुकसान केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा/कदम ९३७०५७४९५२

६.

पोस्टे व गु रजि.नं. :- देहरोड ५३५/२०२२ भा.द.वि.क २७९,३३७, मो.वा.का.कलम १८४,११९/१७७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १८/०८/२०२२ रोजी सकाळी ०७/५० वा. सुमारास शिवाजी विदयालय देहुरोड ता. हवेली जि.पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि १८/०८/२०२२ रोजी वेळ १२/३० वा

फिर्यादी :- संतोष केरभाऊ चासकर वय ४१ वर्षे धंदा मजुरीनोकरी रा. कोतवालनगर, किवळेगांव ता. हवेली जि.पुणे

आरोपी :- लाल रंगाची मोटार सायकल एम.एच. १४ ए.वाय. ९२११ वरील अज्ञात चालक

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी मुलगी रिमा व पत्नी साक्षी असे आम्ही शाळेत जात असतांना लाल रंगाची मोटार सायकल्क्र. एम.एच. १४ ए.वाय. ९२११ वरील अज्ञात चालक त्याची दुचाकी हायगयीने व वेडीवाकडी, भरदाव वेगात आला व नवीन मोटार सायकलला जोराची धडक दिली त्यामध्ये फिर्यादीचे डावे पायाचे गुडघ्याला व उजवे हातास दुखापत झाली. व फिर्यादीची मुलगी रिमा हीस डावे हाताला व पाठीला मुका मार लागला आहे. भाची साक्षी हीस डावे पायचे गुडघ्याला दुखापत झाली आहे. फिर्यादीला धडक देणारा इसम कसल्याही प्रकारे मदत न करता तेथुन निघुन गेला. व फिर्यादीचे नवीन मोटार सायकलचे नुकसानीस कारणीभुत झाला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोना/१६६९ गायकवाड ९६०४००३१४२

७.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ४२३/२०२२ भा द वि कलम ३६३ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक १८/०८/२०२२ रोजी सकाळी ०७/३० वा दरम्यान राहते घरातुन गणेश बालघरे यांची रुम,बालघरे वस्ती चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दिनांक १८/०८/२०२२ रोजी १३/२४ वा

फिर्यादी :- महीला फिर्यादी

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची मुलगी वय-१४ वर्षे (१९/०६/२००९) हिस कोणीतरी आज्ञात इसमाने कशाचेतरी अमिश दाखवुन फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि मुंडकर ७६६६०९१२०४

८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी २५३/२०२२ भादवि क.३७०(३) सह अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१७/०८/२०२२ रोजी सायं १८/३५ वा. चे सुमारास चाकण आळंदी रोड,हनुमान वाडी, आनंद आश्रमजवळ, आळंदी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/०८/२०२२ रोजी ०३.४९ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी |
| आरोपी | :- | ओमकार दत्तु चेवले वय २२ वर्षे रा.मु.धनेगाव पो.सोनवती ता.जि.लातुर<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने त्यांचे स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी पिडीत महिलांना पैशांचे अमिष दाखवुन त्यांचेकडुन जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवुन घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना २४५७०/-रु च्या मुददेमालासह मिळून आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि पाटील ९८५०५७६७८९ |

९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ३७९/२०२२ भादवि कलम ४२०,४१९,४६८,४७१,४५२,४४१ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०१/०४/२०२० ते १८/०८/२०२२ रोजी मेघना सोसायटी मधील फ्लॅट क्र ७ तळेगाव दाभाडे ता मावळ जि पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि १८/०८/२०२२ रोजी १९/०० वा |
| फिर्यादी | :- | प्रसाद सदाशिव मराठे, वय ४४ वर्ष, व्यवसाय आयुर्वेदीक मेडीकल, रा. पीसीएमसी शाळे जवळ, विकास नगर देहुरोड, ता. हवेली, जि. पुणे. |
| आरोपी | :- | आसीफ ताजपिर शेख वय-५१ वर्षे रा .फ्लॅट नं ७मेघना सोसायटी तळेगाव दाभाडे ता मावळ जि पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची मावशी नामे सुनिता कानडे यांचे नावावरील फ्लॅट नं ७ मेघना सोसायटी तळेगाव दाभाडे पुणे येथील फ्लॅटचे संदर्भातील फिर्यादींच्या मावशीच्या बनावट सह्या करुन त्याद्वारे मृत्युपत्र तयार करुन फिर्यादींची फसवणुक करुन फ्लॅट मध्ये फिर्यादींच्या संमतीशिवाय अनाधिकृत प्रवेश करुन अतिक्रमण केले आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शिंपने ९८५०२५५२५९ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ३७८/२०२२ भा.दं. वि. कलम -४१९, ५११,१७० प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१८/०८/२०२२ रोजी सकाळी १० ते ११ वाजेच्या दरम्यान पोलीस आयुक्तालय, पिंपरीचिंचवड |
| गुन्हा दाखल | :- | दि.१८/०८/२०२२ रोजी १९.४५ वा |
| फिर्यादी | :- | कृष्णा विजय गवळी, पोलीस अमंलदार ब.नं/२३०० नेमणुक सायबर सेल, गुन्हे शाखा, पिंपरीचिंचवड शहर |
| आरोपी | :- | मो नं ९१ ७३५८९२१०४६ च्या धारक<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील अज्ञात मोबाईल ९१७३५८९२१०४६ या धारकाने स्वत तो पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड नाही हे माहीत असताना तो पोलीस आयुक्त आहे असे भासवुन त्याने गिफ्ट कार्ड |

देण्याचे बहाण्याणे फसवणुक करण्याचा प्रयत्न केला आहे म्हणन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि/रणवरे ९५५२५५०३१४